

# सफर भूमिगत मेट्रोची...

धावत्या मुंबईला अधिक गतिमान करण्यासाठी शहरात मोठ्या प्रमाणावर मेट्रोचे जाळे विणले जात आहे. 'मेट्रो-३'चा कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा यातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा.. या कामासाठी वैतरणा-१ आणि २ या टीबीएम मशिन्सद्वारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील आझाद मैदान ते ग्रँण्ट रोडपर्यंत ४.५ किमी लांबीचे भुयारीकरण करण्यात येणार असून, सध्या साधारण गिरगावपर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. जमिनीपासून २१ मीटर खोल भूगर्भात चाललेल्या या कामाची ही चित्रमय सफर...

चित्रवृत्त

शैलेश जाधव



१ भुयारात खोदकाम करणारे वैतरणा-२ टीबीएम मशिन.



२ भुयारात छोट्या मालगाडीच्या सहाय्याने सिमेंट मिक्सर, भुयारीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या साचांची ने-आण केली जाते.



३ आझाद मैदान, गिरगाव आणि ग्रँण्ट रोड या ३ टप्प्यातील भुयारीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.



४ या कंट्रोल रूममधून टीबीएम मशिन चालवले जाते.



५ 'मेट्रो-३'अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ सुरू असलेले आझाद मैदान स्थानकाचे काम.




६ भूगर्भात ६५ फूट खोल भुयारीकरणासाठी क्रेनच्या सहाय्याने माल खाली उतरवला जातो.